# शैक्षणिक सेवा विभाग : प्रमाणपत्र शिक्षणक्रम

## शैक्षणिक वेळापत्रक : वर्ष २०१३-२०१४

**संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (Code : C08)**

**(Certificate Programme in Counsellor Training)**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | प्रवेश सुरुवात | : | दि. २४ जून, २०१३, सोमवार |
| ०२. | प्रवेशाची अंतिम तारीख | : | दि. २६ जुलै, २०१३, शुक्रवार |
| ०३. | अभ्यासकेंद्रावर अध्ययन साहित्य उपलब्ध | : | पहिल्या कृतिसत्राच्या दिवशी |
| ०४. | कृतीसत्र कालावधी | : | प्रत्येकी एक दिवसाची दोन कृतीसत्रे (कृपया परिशिष्ट क्र. ९.२ पहा) (कृतीसत्राचे वेळापत्रक अभ्यासकेंद्राकडून विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल.) कृतीसत्रे ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर २०१३ मध्ये होऊ शकतात. |
| ०५. | स्वाध्याय व प्रात्यक्षिक नोंदवही जमा करण्याची अंतिम तारीख | : | दि. १ जानेवारी २०१४ बुधवार (या तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत स्वाध्याय व प्रात्यक्षिक नोंदवही अभ्यासकेंद्रावर जमा करून घेतली जाणार नाही.) |
| ०६. | अभ्यासकेंद्राने परीक्षा विभागास स्वाध्याय व प्रात्यक्षिकांचे गुण कळविण्याची अंतिम तारीख | : | १५ जानेवारी, २०१४, बुधवार |
| ०७. | अंतिम निकाल जाहीर होण्याचा कालावधी | : | फेब्रुवारी, २०१४ |

**विशेष सूचना :**

(१) अभ्यासकेंद्रावरील कृतिसत्रांच्या वेळापत्रकात प्रसंगी बदल होऊ शकतो. झालेला बदल त्या-त्या वेळी अभ्यासकेंद्रांकडून विद्यार्थ्यांना कळविला जातो. तथापि, विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रांशी सतत संपर्कात राहावे.

(२) विद्यापीठाचे सध्याचे व वेळोवेळी बदलणारे परिनियम, अधिनियम तसेच शैक्षणिक सेवा विभागाने निर्गमित केलेले आदेश/सूचना सर्व विद्यार्थ्यांवर बंधनकारक असतील.

(३) प्रत्येक अभ्यासकेंद्रावर एका तुकडीसाठी सत्तर विद्यार्थी एवढीच प्रवेशमर्यादा आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश' या तत्त्वावर पहिल्या सत्तर विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळेल. प्रवेशासंबंधीचे सर्व अधिकार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

### प्रवेश अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडली आहेत की नाहीत ते तपासा -

(१) पदवी गुणपत्रकाची प्रमाणित छाया प्रत (किंवा पदवी प्रमाणपत्राची प्रमाणित छाया प्रत)

(२) जन्मतारखेचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/जन्मप्रमाणपत्र, इत्यादींची प्रमाणित छायाप्रत)

(३) विवाहित विद्यार्थिनींना बदललेल्या नावाने शिक्षणक्रमास प्रवेश हवा असल्यास त्यांनी प्रवेश अर्जासोबत विवाह नोंदणीच्या राजपत्राची अथवा विवाह नोंदणी दाखल्याची प्रमाणित छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.

टीप : **प्रवेश-अर्जात दिलेल्या यादीनुसार कागदपत्रांची (उदाहरणार्थ, पासपोर्ट/डोमिसाईल सर्टिफिकेट/फिटनेस सर्टिफिकेट, इत्यादी) प्रवेशासाठी आवश्यकता नाही. केवळ वरीलप्रमाणे तीन कागदपत्रेच प्रवेश-अर्जासोबत आवश्यक आहेत.**
***प्रवेश अर्जासोबत मूळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.***

वेबसाईट : **http://ycmou.digitaluniversity.ac**

# १. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय

शैक्षणिक सेवा विभाग (Academic Services Division) हा विद्यापीठातील एक महत्त्वाचा शैक्षणिक विभाग आहे. उच्च दर्जाच्या संशोधनाधारित शिक्षणक्रमांची आखणी, त्या शिक्षणक्रमांची अंमलबजावणी व त्यासाठी परिसंवाद वा कृतिसत्रांद्वारे विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्कातून संमंत्रण, उच्च दर्जाच्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती ही या विभागाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहित करणे व त्यासाठी दर्जेदार मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हे या विभागाने आपले ध्येय मानले आहे. या विभागामार्फत सध्या संप्रेषण व दूरशिक्षण क्षेत्रातील एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी. हे शिक्षणक्रम राबविले जातात.

पदव्युत्तर स्तरावरील एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी. या शिक्षणक्रमाचे तात्त्विक भाग (Theory) आणि संशोधन कार्य (Research Work) असे दोन घटक आहेत. हे शिक्षणक्रम सध्या महाराष्ट्रामध्ये सुमारे पन्नास अभ्यासकेंद्रांवर राबविले जातात. शैक्षणिक सेवा विभागातर्फे सदर अभ्यासकेंद्रांशी नियमित संपर्क राखला जातो आणि विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक तसेच प्रशासकीय आधार पुरविला जातो.

सर्व शिक्षणक्रमांच्या विविध टप्प्यांवर गुणवत्ता निश्चितीसाठी सतत विशेष प्रयत्न केले जात असतात. अशा तऱ्हेने संशोधन क्षेत्रातील एका नवीन परंतु भविष्यवेधी उपक्रमाचे संयोजन या विभागातर्फे केले जाते.

महाराष्ट्रात मुक्त विद्यापीठाची साधारणतः २०० शिक्षणक्रमांची शिक्षणक्रमनिहाय ३८०० अभ्यासकेंद्रे कार्यरत आहेत. या अभ्यासकेंद्रांचा विस्तारदेखील वेगाने होतो आहे व त्यासाठी प्रशिक्षित संमंत्रकांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाली आहे. शिक्षणक्षेत्रात कार्यरत नसलेल्या अनेकांना शिक्षक म्हणून काम करण्याची आवड असते. अशा लोकांकडे पदव्युत्तर पदवी ही पात्रता देखील असते. मात्र, शिक्षक म्हणून पूर्णवेळ सेवा देणे त्यांना शक्य होत नाही. असे अनेक लोक मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासकेंद्रांवर संमंत्रक म्हणून काम करू शकतात. अशा संभाव्य संमंत्रकांना शास्त्रोक्त पद्धतीने संमंत्रणाचे प्रशिक्षण देण्याच्या हेतूने शैक्षणिक सेवा विभागाने संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (Certificate Programme in Counsellor Training) विकसित केला आहे. हा शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्यांना व आवश्यक पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्यांना संमंत्रक होण्याची संधी मिळू शकते.

याबरोबरच शैक्षणिक सेवा विभागातून 'मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम' व 'ग्रंथालय संगणकीकरण प्रमाणपत्र' हे शिक्षणक्रमही राबविले जातात. 'गांधी विचार दर्शन पदविका' तसेच बी.ए. (ग्राहकसेवा) हे शिक्षणक्रमही शैक्षणिक सेवा विभाग राबवित आहे.

# २. शिक्षणक्रमाविषयी

## २.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये

### उद्दिष्टे

(१) मुक्त शिक्षण प्रणालीसाठी कुशल संमंत्रक उपलब्ध होण्यासाठी प्रशिक्षण देणे.

(२) कार्यरत संमंत्रकांचे संमंत्रण तंत्रांचे ज्ञान व कौशल्ये अद्ययावत करणे.

(३) दूर शिक्षणासंबंधी सामाजिक जागरुकता निर्माण करणे.

### वैशिष्ट्ये

(१) प्रत्यक्ष कृतिसत्रातून संमंत्रणविषयक मार्गदर्शन.

(२) प्रात्यक्षिक व स्वाध्यायांद्वारे मूल्यमापन.

(३) शिक्षणक्षेत्रात कारकिर्द करू इच्छिणाऱ्या संभाव्य शिक्षकांना अत्यंत उपयुक्त.

## २.२ श्रेयांक

हा शिक्षणक्रम प्रवेश घेतल्यापासून तीन महिने कालावधीचा आहे. शिक्षणक्रम चार श्रेयांकांचा (Credit Points) असून तो विद्यार्थ्यांना संमंत्रणाची कौशल्ये प्राप्त करून देईल. शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विहित पद्धतीनुसार 'संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम' पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळेल. हा शिक्षणक्रम विद्यार्थ्याला दूरशिक्षण क्षेत्रामध्ये संमंत्रण करण्यासाठी तज्ज्ञता मिळवून देईल.

## २.३ शिक्षणक्रमाची उपयुक्तता

(१) प्राथमिक व माध्यमिक स्तरावर सध्या कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना हा शिक्षणक्रम पूर्ण केल्याने त्यांच्या अध्यापन कृतींमध्ये प्रभावी बदल घडवून आणता येतील.

(२) ग्रामीण भागातील उपक्रमशील शिक्षकांना या शिक्षणक्रमातून विद्यार्थ्यांना अधिक कृतीशील बनविण्यासाठी कौशल्ये प्राप्त होतील.

(३) अंगणवाडी सेविका/महिला बचत गट/आरोग्यसेविका/बालसंगोपन शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना 'संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम' पूर्ण केल्यास दैनंदिन जीवनातील आंतरक्रिया अधिक प्रभावी करता येतील.

(४) दूरशिक्षण क्षेत्रात सेवा देऊ इच्छिणाऱ्या संभाव्य कर्मचारी/शिक्षक यांना अत्यंत उपयुक्त.

(५) प्रौढ शिक्षण संस्था/जनशिक्षण संस्था/गैरसरकारी स्वयंसेवी संस्था (NGO)/आरोग्य शिक्षणविषयक सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांमधील कर्मचाऱ्यांची संप्रेषण व संमंत्रण कौशल्ये उंचावण्यास उपयुक्त.

(६) सदर शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास **मुक्त विद्यापीठाच्या बी.एड. शिक्षणक्रमास प्रवेश घेताना दोन गुणांचा भारांक (प्रवेशास प्राधान्य) मिळेल.**

(७) सदर शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास मुक्त विद्यापीठाच्या एम.एड. शिक्षणक्रमास प्रवेश घेताना दोन गुणांचा भारांक (प्रवेशास प्राधान्य) मिळेल.

(८) पदव्युत्तर पदवीस्तरावर किमान द्वितीय श्रेणी (बी+) असणाऱ्या विद्यार्थ्याने सदर प्रमाणपत्र शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यास मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासकेंद्रांवर संबंधित शिक्षणक्रमांसाठी समंत्रक म्हणून काम करण्याची संधी मिळू शकते.

## २.४ शिक्षणक्रमाचा परिचय

सध्या जगभर मुक्त शिक्षणप्रणालीचा वेगाने विकास व विस्तार होत आहे. भारतात अनेक राज्यांमध्ये आतापर्यंत मुक्त विद्यापीठे व मुक्त शाळा स्थापन झाल्या आहेत. अनेक पारंपरिक विद्यापीठांमार्फतही दूरशिक्षण पद्धतीने विविध शिक्षणक्रम राबविले जात आहेत. अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्था, प्रौढ शिक्षण संस्था, गैरसरकारी स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फतही प्रबोधनाचे अनेक कार्यक्रम दूरशिक्षण पद्धतीने राबविले जात आहेत. वेगाने विकसित होत चाललेल्या दूरशिक्षण क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची समंत्रक (कौन्सिलर्स) म्हणून मोठ्या प्रमाणावर गरज आहे. ही गरज भागविण्याच्या दृष्टीने सदर शिक्षणक्रमाची रचना करण्यात आलेली आहे.

प्रत्येकी एक दिवसाच्या दोन पूर्णवेळ कृतिसत्रांमधून या शिक्षणक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळेल. तसेच चार स्वाध्याय व दोन प्रात्यक्षिक यांमधून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाईल.

## २.५ शिक्षणक्रमाची संरचना

सदर शिक्षणक्रमाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी दोन कृतिसत्रे होतील, ती खालीलप्रमाणे –

### (अ) पहिले कृतिसत्र

हे कृतिसत्र पूर्ण एक दिवसाचे असेल. या कृतिसत्रात शिक्षणक्रमाच्या अंमलबजावणीचा परिचय करून दिला जाईल. स्वाध्याय लेखन, प्रात्यक्षिक कार्य कसे करावे याची माहिती दिली जाईल. दूर शिक्षण प्रणाली, मुक्त विद्यापीठाची कार्यप्रणाली व समंत्रण या संकल्पना स्पष्ट केल्या जातील. या कृतिसत्रातच विद्यार्थ्यांना अध्ययन साहित्य दिले जाईल. स्वाध्यायाचे प्रश्न व प्रात्यक्षिक कार्याच्या सूचना दिल्या जातील.

### (ब) दुसरे कृतिसत्र

हे कृतिसत्र एक दिवसाचे असेल. या कृतिसत्रात प्रत्यक्ष समंत्रण कसे घ्यायचे, विविध तंत्रज्ञानाचा समंत्रणात वापर कसा करावयाचा या विषयी माहिती दिली जाईल.

विद्यार्थ्यांनी दोन्ही कृतिसत्रांना पूर्णवेळ उपस्थित राहणे अनिवार्य आहे. (कृतिसत्राच्या कार्यक्रमपत्रिकेसाठी पृष्ठ क्र.८ वरील परिशिष्ट क्र. ९.२ पहावे)

## २.६ शिक्षणक्रमाचा कालावधी

सदर प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण करण्याचा कालावधी तीन महिन्यांचा आहे. या शिक्षणक्रमांतर्गत दोन कृतिसत्रे, चार स्वाध्याय व दोन प्रात्यक्षिके पूर्ण करणे अनिवार्य आहे. सदर शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी त्या तुकडीपुरतीच ग्राह्य धरली जाते. त्यामुळे प्रवेश घेतल्यापासून विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे हा शिक्षणक्रम पूर्ण केला पाहिजे. प्रवेशीत तुकडीसाठी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सदर शिक्षणक्रम पूर्ण न झाल्यास विद्यार्थ्यास पुनर्नोंदणी करता येणार नाही.

## २.७ अध्ययन पद्धती

सदर शिक्षणक्रम हा कृतिसत्रातून समंत्रणाद्वारे प्रशिक्षणावर भर देणारा आहे. प्रत्यक्ष आंतरक्रियात्मक संपर्क कसा साधावा याचे कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे यासाठी दोन्ही कृतिसत्रांतून भर दिला जाईल. विद्यार्थ्यांना स्वयं–अध्ययनासाठी पुस्तके दिली जातील. त्याचप्रमाणे काही संदर्भ पुस्तकांची शिफारस केली जाईल. विविध ग्रंथालयांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांनी स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करावयाचे आहे. संदर्भग्रंथ विद्यार्थ्यांनी स्वतः मिळवावयाचे आहेत.

## २.८ माध्यम

प्रमाणपत्र शिक्षणक्रम मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमातून उपलब्ध आहे. कृतीसत्रे व अध्ययन साहित्य मात्र मराठीतच उपलब्ध असेल.

# ३. प्रवेश पात्रता

## ३.१ प्रवेश पात्रता

कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण.

**टिप** : प्रवेश पात्रता नसतांनाही एखाद्या विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज, बँक चलन भरल्यास त्यास तो विद्यार्थीच सर्वस्वी जबाबदार राहील.

## ३.२ शिक्षणक्रम शुल्क

या शिक्षणक्रमाचे एकूण शुल्क रु.१०००/– (एक हजार मात्र) आहे. शिक्षणक्रमाचे शुल्क रु.१०००/– जमा करताना विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे विभागणी करावी.

| | |
|---|---|
| अभ्यासकेंद्र शुल्क | रु.५००/– |
| विद्यापीठ शुल्क | रु.५००/– |
| **एकूण शिक्षणक्रम शुल्क** | **रु.१०००/–** |

**यात नोंदणी शुल्क, शिक्षणक्रम शुल्क, मूल्यमापन शुल्क, गुणपत्रक व टपाल खर्च, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यापीठ निधी, प्रमाणपत्र शुल्क, आपत्कालीन निधी शुल्क, ओळखपत्र शुल्क, इत्यादींचा अंतर्भाव आहे. अभ्यासकेंद्राचे शुल्क रुपये ५००/– अभ्यासकेंद्रावर रोखीने जमा करून पावती घ्यावी व उर्वरित रुपये ५००/– विद्यापीठाने निर्धारित केलेल्या बँकेत चलनाद्वारे भरावेत.**

**विद्यार्थ्याने नोंदणी रद्द केली वा अन्य कोणत्याही कारणाने शिक्षणक्रम शुल्क परत केले जाणार नाही.**

# ४. मूल्यमापन प्रक्रिया

या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन दोन प्रकाराने केले जाईल.

(१) स्वाध्यायाद्वारे मूल्यनिर्धारण,

(२) प्रात्यक्षिकाद्वारे मूल्यनिर्धारण.

## ४.१ स्वाध्याय

परिशिष्ट क्र. ९.१ मध्ये दूरशिक्षण (OPN 041), मुक्त विद्यापीठातील शिक्षण (OPN 042) आणि संमंत्रण कौशल्ये (OPN 043) अशा तीन अभ्यासक्रमांचा पाठ्यक्रम दिलेला आहे. या तीन पाठ्यक्रमांवर आधारित चार स्वाध्यायांचे लेखन विद्यार्थ्याने करावयाचे आहे. प्रत्येक स्वाध्याय २५ गुणांचा असेल. याचाच अर्थ, १०० गुणांसाठी एकूण चार स्वाध्याय विद्यार्थ्याने लिहावयाचे आहेत. प्रत्येक विषयाच्या स्वाध्यायासाठी विद्यार्थ्याने स्वतंत्र वही तयार करावयाची आहे. हे स्वाध्याय पुढीलप्रमाणे लिहावयाचे आहेत –

| *अ. क्र.* | *अभ्यासक्रम* | *स्वाध्याय संख्या* | *प्रत्येक स्वाध्याय गुण* | *एकूण गुण* |
|---|---|---|---|---|
| १. | दूर शिक्षण (OPN041) | ०१ | २५ | २५ |
| २. | मुक्त विद्यापीठातील शिक्षण (OPN042) | ०१ | २५ | २५ |
| ३. | संमंत्रण कौशल्ये (OPN043) | ०२ | २५ | ५० |

विद्यार्थ्यांनी स्वाध्याय आपल्या अभ्यासकेंद्रावरील केंद्रसंयोजक किंवा केंद्रसहायक यांचेकडे तपासण्यासाठी सुपूर्द करावयाचे आहेत. **स्वाध्यायांचे प्रश्न व प्रात्यक्षिके यांची माहिती मार्गदर्शक पुस्तिकेतून आपणास मिळेल. 'स्वाध्याय व प्रात्यक्षिक मार्गदर्शिका' आपणास अभ्यासकेंद्रावर पहिल्या कृतीसत्राच्या दिवशी मिळेल. तिन्ही अभ्यासक्रमांचे चारही स्वाध्याय पूर्ण करणे अनिवार्य आहे. त्यासाठी तीन विषयांच्या तीन वह्या तयार कराव्यात.**

## ४.२ प्रात्यक्षिक

विद्यार्थ्याने स्वतःची फुलस्केप आकाराची एक प्रात्यक्षिक वही तयार करायची असून त्यामध्ये प्रत्येकी ५० गुणांची दोन प्रात्यक्षिके (एकूण १०० गुण) पूर्ण करावयाची आहेत. मुक्त विद्यापीठाच्या कोणत्याही शिक्षणक्रमातील एका अभ्यासक्रमावर आधारित संमंत्रण आराखडा एका प्रात्यक्षिकासाठी सादर करावयाचा आहे. दुसऱ्या प्रात्यक्षिकामध्ये दोन तासिकेच्या एका संमंत्रणासाठीची पूर्वतयारी/टाचण तयार करावयाचे आहे. या प्रश्नांना पर्याय दिलेले असतील.

स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य कसे पूर्ण करावयाचे याबद्दलचे मार्गदर्शन कृतिसत्रामध्ये केले जाईल.

स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्यासाठी विद्यार्थ्याला प्रत्येकी अनुक्रमे १०० पैकी किमान ४० गुण प्राप्त करणे आवश्यक असेल.

स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य यांच्या एकूण २०० गुणांपैकी सदर शिक्षणक्रमामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी एकूण मिळून (Aggregate) किमान ८० गुण विद्यार्थ्याने प्राप्त केले पाहिजेत.

## ४.३ सादरीकरण

विद्यार्थ्यांना स्वाध्याय व प्रात्यक्षिके लिहून एकदाच सादर करता येतील. त्यात अनुत्तीर्ण झाल्यास पुन्हा सादरीकरणाची संधी नाही. स्वाध्याय व प्रात्यक्षिके ठरलेल्या मुदतीतच अभ्यासकेंद्रावर सादर करावीत. उशिरा सादरीकरण करता येणार नाही.

# ५. नोंदणी प्रक्रिया

१. विद्यार्थ्यांनी प्रवेश–अर्ज व बँक चलन अभ्यासकेंद्रावरून घ्यावे.

२. माहितीपुस्तिका, प्रवेश–अर्ज व बँक चलन काळजीपूर्वक वाचल्यानंतरच प्रवेश अर्ज व चलन स्वतः भरावे.

३. प्रवेश–अर्ज आणि बँक चलन खाडाखोड न करता सुस्पष्ट अक्षरात काळ्या शाईने इंग्रजीतच भरावे.

४. प्रवेश–अर्जासोबत विहित प्रवेश शुल्काचे बँक चलन व पात्रतेसंबंधीची आवश्यक ती कागदपत्रे छायांकित सत्यप्रतीत (ॲटेस्टेड झेरॉक्स प्रत) जोडावीत.

५. अभ्यास–केंद्राकडून तपासून प्रवेश–अर्ज व चलनावर सही शिक्का घ्यावा नंतर विद्यापीठाने निर्धारित केलेल्या बँकेत (सेंट्रल बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र बँक किंवा बँक ऑफ इंडिया) पैसे (विद्यापीठ शुल्क) भरण्यासाठी जावे. **विद्यापीठाचे शुल्क** कोणत्याही परिस्थितीत केंद्रसंयोजक / सहायक यांच्याकडे रोखीने देऊ नये, दिल्यास विद्यार्थी त्यास सर्वस्वी जबाबदार राहील.

६. विद्यापीठ शुल्काची रक्कम रुपये ५००/– (पाचशे) चलनाद्वारे विद्यापीठ निर्धारित बँकेच्या शाखेतच जमा करावी. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या बँके व्यतिरिक्त अन्य बँकेत पैसे भरू नयेत.

७. **अभ्यासकेंद्राच्या ठिकाणी वरील तीनपैकी एकाही बँकेची शाखा नसेल तर अशा वेळी विद्यार्थ्यांनी त्याच बँकेच्या ई–बँकिंगची सुविधा असलेल्या जवळच्या शाखेतच (पण अभ्यासकेंद्र ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्यातील निर्धारित बँक शाखेतच) चलन भरावे. निर्धारित बँके–व्यतिरिक्त कोणत्याही बँकेत शुल्क भरू नये.**

८. चलनाच्या तीन प्रतींपैकी (A, B **व** C) A ही प्रत बँक स्वतःकडे ठेवेल. B व C या प्रती बँकेकडून विद्यार्थ्यास मिळतील. चलनाच्या प्रतींवर बँकेकडून सही व शिक्का तसेच ट्रॅन्झॅक्शन नंबर घ्यावा.

९. बँकेकडून विद्यार्थ्यांनी घेतलेल्या चलनाच्या दोन प्रतींपैकी एक प्रवेश–अर्जासोबत (B) जोडावी व एक (C) स्वतःकडे ठेवावी. तसेच प्रवेश–अर्जाची झेरॉक्स प्रतही विद्यार्थ्याने स्वतःजवळ ठेवावी.

१०. उर्वरित अभ्यासकेंद्र शुल्काची रुक्कम रु.५००/– (पाचशे) अभ्यासकेंद्रावरील अधिकृत व्यक्तीकडे जमा करावी.

**अभ्यासकेंद्राकडून रु.५००/- मिळाल्याची पावती व प्रवेश अर्ज जमा केल्याची पावती घ्यावी.**

११. प्रवेश-अर्जाची नोंदणी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) मार्फत संगणकीय प्रणालीद्वारे केली जाते. त्यामुळे प्रवेश अर्ज अचूक व पूर्ण भरण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर राहील. तसेच प्रवेश-अर्ज व चलन तपासण्याची जबाबदारी अभ्यासकेंद्र संयोजकांची राहील.

१२. केंद्रसंयोजकांकडून अचूक व तपासलेले प्रवेश-अर्ज निर्धारित मुदतीत **चलनासह फक्त अभ्यासकेंद्रावरच स्वीकारले जातील.** प्रवेशाच्या अंतिम मुदतीनंतर बँकेत, अभ्यासकेंद्र, विभागीय केंद्र व विद्यापीठ मुख्यालयात कोणत्याही परिस्थितीत प्रवेश-अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

१३. विभागीय केंद्र / मुख्यालयात प्रवेश-अर्ज पोस्टाने / कुरियरने पाठवू नये. परस्पर पाठविलेले प्रवेश-अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. **प्रवेश-अर्ज अभ्यासकेंद्रावरच जमा करावयाचे आहेत ह्याची नोंद घ्यावी.**

१४. विद्यापीठ प्रवेश-शुल्काची पावती अभ्यासकेंद्राकडून दिली जाणार नाही. बँकेचे चलन हीच पावती होय.

१५. अंतिम प्रवेश निश्चितीसाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर स्वतः चौकशी करावयाची आहे. प्रवेश निश्चित झाल्याशिवाय परीक्षा देता येणार नाही.

१६. विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास त्यास प्रवेश शुल्क परत मिळणार नाही.

१७. प्रवेश अर्जाची छायाप्रत विद्यार्थ्याने स्वतःकडे ठेवावी. छायाप्रतीवर मूळ अर्ज अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतर पोहोच घ्यावी.

१८. एखाद्या केंद्रावर कमी संख्येने प्रवेश झाल्यास विद्यार्थ्यास अन्य केंद्रावर वर्ग (Transfer) करण्यात येईल. केंद्र बदलाचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

## ६. अभ्यासकेंद्रे

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | सांकेताक |
|---|---|---|
| (1) | श्री शिवाजी बी.एड. कॉलेज, शिवाजी नगर, डॉ. पंजाबराव देशमुख चौक अमरावती - 444 606 | 1275A |
| (2) | कॉलेज ऑफ मॅनेजमेंट दूरदर्शन केंद्राजवळ, वामन नगर, मु.पो. खामगाव, जि. बुलढाणा-444303 | 1392A |
| (3) | त्यागी सेवा मंडळाचे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन, गांधी नगर, चर्चजवळ, यवतमाळ-445 001 | 1473A |
| (4) | सरस्वती भुवन कला, वाणिज्य महाविद्यालय औरंगपुरा, सरस्वतीनगर, औरंगाबाद-431001 | 2103A |
| (5) | महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय पन्नालालनगर, सत्यजित होस्टेल, औरंगाबाद-431001 | 21155 |
| (6) | वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, छत्रपती कॉलनी, जुना जालना, जालना-431 203 | 2321A |
| (7) | रामकृष्ण परमहंस महाविद्यालय (आर.पी.कॉलेज), उस्मानाबाद-431 501 | 2602A |
| (8) | पी.व्ही.डी.टी. महिला शिक्षणशास्त्र महा. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, 1, नाथीबाई ठाकरसी मार्ग, चर्चगेट, मुंबई-400 020 | 3186A |
| (9) | अनिकेत समाजकार्य महाविद्यालय देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली | 4325A |
| (10) | ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय क्रीडाचौक, हनुमान नगर, नागपूर-440 009 | 44203 |
| (11) | यशोदा गर्ल्स कला, वाणिज्य महाविद्यालय स्नेहनगर, वर्धारोड, नागपूर-440 015 | 44329 |
| (12) | शिववैभव ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्यूकेशन बॅचलर रोड, मानस मंदिर, वर्धा -442 001 | 4549A |
| (13) | न्यू आर्टस् कॉलेज, अहमदनगर अहमदनगर - 414 001 | 5118A |
| (14) | ज्ञानोपासक शिक्षण मंडळीचे शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे | 5278A |
| (15) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, मु.पो. मोराणे (नकाणे), जि. धुळे - 424 101 | 52135 |
| (16) | के.टी. एच. एम. महाविद्यालय शिवाजी नगर, गंगापूर रोड, नाशिक - 422 002 | 5404A |
| (17) | नाशिक एज्युकेशन सोसा.चे पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक - 422 001 | 54204 |
| (18) | कला, वाणिज्य महिला महाविद्यालय जेलरोड, नाशिकरोड, नाशिक- 422 010 | 54245 |
| (19) | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, पहिला मजला, महानगरपालिका बाजार, महात्मा नगर, नाशिक - 422 005 | 54282 |
| (20) | नंदूरबार तालुका विधायक समितीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय नंदूरबार - 425 412 | 5507A |
| (21) | सी.टी. बोरा महाविद्यालय मु.पो.ता. शिरूर (घोडनदी),जि. पुणे- 412 210 | 6214A |

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | सांकेताक |
|---|---|---|
| (22) | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, सेकंड फेज, एल बिल्डींग पिनाक मेमरीज, कोथरूड बस स्टँडजवळ कोथरूड, पुणे-411 038 | 62258 |
| (23) | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, बागल मार्केट, पहिला मजला, राजारामपुरी, लेन नं.1 जनता बाजाराच्या वर, कोल्हापूर-416 008 | 71179 |
| (24) | कन्या महाविद्यालय, पो.बॉ.क्र.29 छत्रपती शिवाजी नगर, मिरज जि. सांगली - 416 410 | 7280A |
| (25) | श्री. पंचम खेमराज महाविद्यालय सावंतवाडी, जि. सिंधुदूर्ग - 416 510 | 7451A |
| (26) | यशवंत महाविद्यालय, मेनरोड नांदेड-431 602 | 8501A |
| (27) | दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य महाविद्यालय मु.पो.ता. भोकर, जि. नांदेड | 8576A |
| (28) | कै. सौ. शोषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी- 431 514 | 87103 |
| (29) | रेनबो कॉम्प्युटर्स, शिवाजी नगर, हिंगोली -431 513 | 8801A |
| (30) | शिवाजी कॉलेज, कोठजल रोड हिंगोली-431 513 | 8804A |
| (31) | संजीवनी महाविद्यालय मु.पो. चापोली, ता. चाकूर, जि. लातूर - 412 513 | 8491A |
| (32) | श्री. दादासाहेब तारे चॅरीटेबल ट्रस्ट सावरकर नगर, बिलनपूरा, अचलपूर जि. अमरावती - 444806 | 8804A |

## ७. विभागीय केंद्रे

**(१) अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही.
अमरावती - ४४४ ६०४
(०७२१) २५३१४४५
फॅक्स : (०७२१) २५३१४४४

**(२) औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांचे वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी औरंगाबाद - ४३१ ००२
(०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

**(३) मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी प्राथमिक शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक ग्रँट रोड (प.) मुंबई - ४०० ००७
(०२२) २३८७४१८६, २३८२६१३५
फॅक्स : (०२२) २३८१३२५६

**(४) नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस, रविनगर चौक,
नागपूर - ४४० ००१
(०७१२) २५५३७२४/२५
फॅक्स: (०७१२)२५५३७२५

**(५) नाशिक :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला नवीन पंडित कॉलनी,
नाशिक -४२२ ००२
(०२५३) २३१७०६३
फॅक्स : (०२५३) २५७६७५६

**(६) पुणे :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ
हौदासमोर कुमठेकर मार्ग, पुणे -४११ ०३०
(०२०) २४४९११०७
फॅक्स : (०२०) २४४५७९१४

**(७) कोल्हापूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ
विद्यानगर,कोल्हापूर - ४१६ ००४
(०२३१) २६०७०२२
फॅक्स : (०२३१)२६०७०२३

**(८) नांदेड :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, क्रीडा इमारत, नांदेड - ४२१ ६०६
(०२४६२) २२९९४०
फॅक्स : (०२४६२) २२९९५०

**(९) गोवा :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे गोवा विभागीय केंद्र
द्वारा : पंचम खेमराज महाविद्यालय,
सावंतवाडी - ४१६ ५१०, जि. सिंधुदुर्ग
मोबाईल : ९४२३९६३८६२

**(१०) कल्याण :** कै. खासदार प्रकाश परांजपे
स्पर्धात्मक परीक्षा केंद्र कल्याण विभागीय केंद्र
कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची इमारत
चंद्रभूषण प्लाझा, मिश्रा कंपाऊंड सहजानंद चौक,
कल्याण (पं.) - ४२१ ३०१

**(११) सोलापूर :** विभागीय संचालक
मुक्त विद्यापीठाचे सोलापूर विभागीय केंद्र
द्वारा : दयानंद महाविद्यालय, सोलापूर ४१३ ००२
(००१७) २३७५५११, २३७५५२२
९४२२२९२६७२

## ८. विशेष सूचना/संपर्कासाठी

(१) विद्यापीठाने वेळोवेळी केलेले बदल लागू असतील.

(२) विद्यापीठाचे सध्याचे वा वेळोवेळी बदलणारे परिनियम, अधिनियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक असतील.

(३) शैक्षणिक सेवा विभागाने दिलेले निर्देश, सूचना विद्यार्थ्यांवर बंधनकारक असतील.

(४) अभ्यासकेंद्रावर पुस्तके उपलब्ध झाल्यानंतर अभ्यासकेंद्राच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांनी ती ताब्यात घ्यावीत.

(५) गुणपत्रके व प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना अभ्यासकेंद्रावर प्राप्त होतील. विद्यार्थ्यांनी त्यासाठी अभ्यासकेंद्राच्या संपर्कात रहावे.

(६) **प्रवेश-अर्ज काळ्या शाई पेननेच भरावा.**

(७) आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर पुरेशी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर वर्ग (Transfer) करण्यात येईल.

### ■ संपर्क

**शैक्षणिक बाबींविषयी**
**प्रा. डॉ. प्रमोद बियाणी**
प्राध्यापक व संचालक, शैक्षणिक सेवा विभाग
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३-२२३००१० व २२३००४७

### ■ निकालविषयक चौकशी

उपकुलसचिव
परीक्षा विभाग, युनिट क्र. एक
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३-२२३०७१६

### ■ कार्यालयीन पत्रव्यवहाराचा पत्ता

**शैक्षणिक सेवा विभाग**
**(Academic Services Division)**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३ - २२३००१०
०२५३ - २२३००४७
फॅक्स : ०२५३ - २२३००४७

■ ■ ■

## शैक्षणिक सेवा विभागाचे (Academic Services Division) चे शिक्षणक्रम

**प्रमाणपत्र स्तर :**
(१) संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम
(२) मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम
(३) ग्रंथालय संगणकीकरण प्रमाणपत्र शिक्षणक्रम

**पदविका स्तर :**
(१) गांधी विचार दर्शन पदविका शिक्षणक्रम

**पदवी स्तर :**
(१) बी.ए. (ग्राहक सेवा)

**पदव्युत्तर स्तर :**
(१) एम.ए. विषय संप्रेषण
(२) एम.ए. शैक्षणिक संप्रेषण
(३) एम.ए. दूर शिक्षण
(४) एम.कॉम. विषय संप्रेषण
(५) एम.एस्सी. विषय संप्रेषण

# ९. परिशिष्ट

## ९.१ समंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचा पाठ्यक्रम (Syllabus)

### दूर शिक्षण (OPN 041)

(०१) दूर शिक्षण – गरज, अर्थ, व्याख्या, व्याप्ती
(०२) वैशिष्ट्ये
(०३) दूर शिक्षणाचा विकास व इतिहास
(०४) प्रतिमाने
(०५) समस्या
(०६) भवितव्य
(०७) दूर शिक्षणाची संप्रेषणाची मुख्य साधने/घटक
(०८) पारंपरिक शिक्षण व दूर शिक्षण यांतील फरक
(०९) पारंपरिक शिक्षण व दूर शिक्षणातील विद्यार्थी – तुलना व वैशिष्ट्ये
(१०) प्रौढ व निरंतर शिक्षण
(११) अनौपचारिक शिक्षण

### मुक्त विद्यापीठातील शिक्षण (OPN 042)

(०१) मुक्त शिक्षण/मुक्त विद्यापीठ : संकल्पना
(०२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची संरचना
(०३) अध्ययन साहित्याची वैशिष्ट्ये
(०४) मुक्त विद्यापीठाची शिक्षणक्रम राबविण्याची यंत्रणा
(०५) स्वयं–अध्ययन आणि स्वयं–मूल्यमापन
(०६) मुक्त विद्यापीठाची परीक्षा आयोजन कार्यपद्धती

### समंत्रण कौशल्ये (OPN 043)

(०१) समंत्रण – व्याख्या, संकल्पना व स्वरुप
(०२) समंत्रणाची उद्दिष्टे
(०३) समंत्रण/मार्गदर्शन/व्याख्यान यांतील फरक
(०४) समंत्रकांचे गुणविशेष व कौशल्य
(०५) समंत्रण करताना पाळावयाची तत्त्वे/पथ्ये
(०६) समंत्रकाची कार्ये व भूमिका
(०७) समंत्रणाचे प्रकार व माध्यमे
(०८) समंत्रणात दृक्–श्राव्य साधनांचा उपयोग
(०९) समंत्रणाद्वारे विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी लागणारी कौशल्ये – संकल्पना सुलभीकरण/भाषिक कौशल्ये/अध्ययन साहित्याचा शंकानिरसनासाठी वापर
(१०) समंत्रणातील अडथळे आणि त्यावरील उपाययोजना
(११) मुक्त शिक्षणातील समंत्रणाची अपरिहार्यता
(१२) मुक्त विद्यापीठात वापरले जाणारे पारिभाषिक शब्द व त्यांचे अर्थ

## ९.२ प्रथम व द्वितीय कृतीसत्रांचे वेळापत्रक

### प्रथम कृतिसत्र

सकाळी १० ते १०.४५ : विद्यार्थ्यांची नाव नोंदणी व अध्ययन साहित्य वितरण
सकाळी १०.४५ ते ११.१५ : उद्घाटन
सकाळी ११.१५ ते ११.३० : चहा
सकाळी ११.३० ते १२.१५ : दूरशिक्षण संकल्पना व तत्त्वज्ञान
दुपारी १२.१५ ते १.०० : मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रम अंमलबजावणी कार्यपद्धती
दुपारी १.०० ते २.०० : भोजनाची सुट्टी
दुपारी २.०० ते ३.०० : समंत्रण – संकल्पना, उद्दिष्टे, गरज आणि समंत्रकांसाठी आवश्यक कौशल्ये
दुपारी ३.०० ते ४.०० : दूरशिक्षणातील समंत्रणाचे महत्त्व आणि समंत्रण करतेवेळी घेण्याची काळजी
दुपारी ४.०० ते ४.१५ : चहापान
दुपारी ४.१५ ते ४.४५ : पुढील कृतीसत्राबाबत सूचना/प्रात्यक्षिक व स्वाध्याय लेखन याबाबत सूचना : केंद्रसंयोजक

### द्वितीय कृतिसत्र

सकाळी १० ते ११.०० : समंत्रणाची पूर्वतयारी व माध्यमांचा वापर
सकाळी ११.०० ते ११.१५ : चहा
सकाळी ११.१५ ते १२.०० : प्रौढ व अनौपचारिक शिक्षण
दुपारी १२.०० ते १.०० : अध्ययन कौशल्ये व त्यावरील प्रभुत्व
दुपारी १.०० ते २.०० : भोजनाची सुट्टी
दुपारी २.०० ते २.४५ : प्रात्यक्षिक मार्गदर्शन – प्रात्यक्षिक कसे करावे? (नमुना चालवून दाखविणे)
दुपारी २.४५ ते ३.४५ : गटचर्चा (गटनिहाय एका प्रात्यक्षिकाचे लेखन)
दुपारी ३.४५ ते ४.०० : चहापान
दुपारी ४.१० ते ४.४५ : गटचर्चेचे सादरीकरण (प्रत्येक गटप्रमुखास १५ मिनीटे द्यावीत. २५ विद्यार्थ्यांचा एक गट असे तीन गट करावेत)
दुपारी ४.४५ ते ५.३० : निरोप समारंभ

## ९.३ : University Grants Commission Resolution (2004)

विश्वविद्यालय अनुदान आयोग
बहादुरशाह जाफर मार्ग
नई दिल्ली–११० ००२
**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BAHADURSHAH ZAFAR MARG**
**NEW DELHI-110002**

F1-52/2000(CPP-II) 5 MAY 2004

The Registrar / Director
Of all the Indian Universities
(Deemed, State, Central Universities /
Institutions of National importance)

Subject : Recognition of Degrees awarded by Open Universities.

Sir/Madam,

There are a number of open Universities in the country offering various degrees/diploma through the mode of non-formal education. **The Open Universities have been established in the country by an Act of Parliament or State Legislature in accordance with the provisions contained in Section 2(f) of University Grants Commission Act, 1956. These universities are, therefore, empowered to award degrees in terms of Section 22(1) of the UGC Act, 1956.**

A circular was earlier issued vide UGC letter N.F.1-8/92(CPP) dated February, 1992 mentioning that the Certificate, Diplomas and Degrees awarded by Indira Gandhi National Open University are to be treated equivalent to the corresponding awards of the Universities in the country.

Attention is further invited to UGC circular No.F1-25/93(CPP-II) dated 28th July, 1993 (copy enclosed) for recognition of degrees and diplomas as well as transfer of credit for courses successfully completed by students between the two types of universities so that the mobility of students from Open University stream to traditional Universities is ensured without any difficulty.

The UGC has specified the nomenclature of degrees under Section 22(3) of the UGC Act, 1956 to ensure mandatory requirements viz. minimum essential academic inputs required for awarding such degrees. A copy of Gazette Notification regarding specification of degrees issued vide No.1-52/97(CPP-II) dated 31st January 2004 is enclosed. The details are also given in UGC Web site : www.ugc.ac.in

**May, I therefore request you to treat the Degrees / Diploma / Certificates awarded by the Open Universities in conformity with the UGC notification on Specification of Degrees as equivalent to the corresponding awards of the traditional Universities in the country.**

Yours faithfully

**(Dr. Mrs. Pankaj Mittal)**
**Joint Secretary**

**Encl. : As Above**
**Copy to :**

1. The Secretary, Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Secondary Education and Higher Education, Shastri Bhavan, New Delhi-110001.
2. The Secretary, All Indian Council for Technical Education, I.G. Sports Complex, Indraprastha Estate, New Delhi
3. The Secretary, Association of Indian Universities (AIU), 16, Comrade Inderjit Gupta Marg, New Delhi -110002.
4. The Secretary, National Council for Teacher Education, I.G. Stadium, I. P. Estate, New Delhi-110002.
5. The Director of Distance Education Council, IGNOU Campus, Maidan Garhi, New Delhi-110068.
6. The Vice-Chancellor, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi-110068.
7. The Vice-Chancellor, Dr. B. R. Ambedkar Open University, Road, No. 46, Jubilee Hills, Hyderabad (AP)
8. The Vice-Chancellor, Nalanda Open University, West Gandhi Maidan, Patna-800001 (Bihar)
9. The Vice-Chancellor, Dr. Babasaheb Ambedkar Open University, Shahigaug, Ahmedabad-380003 (Gujarat)
10. The Vice-Chancellor, Karnataka State Open University, Manasagangotri, Mysore-570006 (Karnataka)
11. The Vice-Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422222 (Maharashtra)
12. The Vice-Chancellor, Kota Open University, Vardhaman Mahaveer Open University, Kota-324010 (Rajasthan)
13. The Vice-Chancellor, Netaji Subhash Open University, Kolkata-700020 (West Bengal)
14. The Vice-Chancellor, Madhya Pradesh Bhoj (Open) University, Bhopal-462016 (M.P.)

**(V.K. Jaiswal)**
**Under Secretary**

## ९.४ मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासनमान्यता

(१) **अन्य विद्यापीठांच्या पदवीशी समकक्षता**

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्र क्र. समक (उ. शि.)/१०९४/३२८६१/मवि-१, दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या पत्रान्वये 'केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेली पदवी/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था प्रस्तावित केलेल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) मधील कलम क्र. ३ अन्वये मानीव विद्यापीठे घोषित केली आहेत अशांच्या बाबतीत पदवी किंवा पदविका मान्यता देण्याबाबतचे औपचारिक आदेश विद्यापीठाने काढण्याची आवश्यकता नाही'.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने अधिनियमाद्वारे (कायदा क्र. २०/१९८९) स्थापन केलेले विद्यापीठ असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचीही मान्यता आहे. **त्यामुळे या विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.**

(२) **विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F/S-15/89 (CPP-I) दि. ८ डिसेंबर १९९२ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील कलम १२-बी अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मान्यता दिली आहे.

(३) **महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता**

उपसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्र क्र. १४७७ (१७/१९९४/कक्ष) **दि. १७ फेब्रुवारी १९९४ च्या पत्रातील मान्यतेसंबंधीचा मजकूर – 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे संविधिमान्य (Statutory) असल्यामुळे आपल्या विद्यापीठाच्या पदवीधर विद्यार्थ्यांकडून आलेले अर्ज देखील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीधर उमेदवारांकडून आलेल्या अर्जांप्रमाणेच आयोगाकडून विचारात घेतले जातील'**

## ९.५ मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली विद्यापीठे

राज्य सेवेतील पदासांठी पदवी/पदविकास मान्यता

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय** : क्रमांक आरजीडी-१३९४/प्र.क्र. २१/९४/१३,मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ८ मार्च १९९५

**वाचा** : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरजीडी-१०६१/१८९६७/११४ - जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९

**शासन निर्णय** : महाराष्ट्र लोक सेवा आयोगाशी विचार विनिमय करून उपरोक्त दिनांक २१ ऑगस्ट १९६९ च्या आदेशाद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, केंद्र अथवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापित झालेली विद्यापीठे, संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्था, किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गत भाग ३ अन्वये जाहीर झालेली मानवी विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका तसेच भारतीय वैद्यकीय मंडळ अधिनियम, १९५६ च्या परिशिष्टांमध्ये अंतर्भूत केलेल्या वैद्यकीय व संलग्न विषयामधील पदव्या यांना शासकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदे वगळता, **राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी आपोआप मान्यता प्राप्त झाली असल्याचे समजण्यात यावे.**

(२) सदर आदेशासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या वैधानिक विद्यापीठे व संस्थांची यादी जोडण्यात आली होती. आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे व संस्था यांची अद्ययावत यादी आता या आदेशासोबत जोडण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी - १०६१/१८९६७/११४/जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९ मध्ये नमूद केलेल्या आणि वर परिच्छेद १ मध्ये उद्धृत केलेल्या हेतूसाठी सदर सर्व विद्यापीठे/संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना आपोआप मान्यता देण्यात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

दा. र. राणे

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) राज्यपालांचे सचिव
(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव
(३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
(४) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
(५) महालेखापाल, महाराष्ट्र -२, मुंबई
(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(७) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
(९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
(१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
(११) सर्व मंत्रालयीन शिक्षण
(१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
(१३) अवर सचिव, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली
(१४) निवड नस्ती

**वाचा : महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णय क्रमांक आर.जी.डी. १३९४/प्र.क्र.२१/९४/१३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ८ मार्च १९९५ च्या सोबत जोडलेल्या यादीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अनुक्रमांक १४६ वर नोंद करण्यात आलेली आहे.**

## ९.६ : १0वी व १२वी समकक्षतेबाबत शासन निर्णय

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांची प्रमाणपत्रे शासनसेवेसाठी समकक्ष म्हणून विचारात घेण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : आरजीडी–१५११/प्र.क्र.८९/१३,
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई–४०००३२
दिनांक : २० मे, २०११.

__वाचा__

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी–१३९८/प्र.क्र.६७/९८/१३, दिनांक १० डिसेंबर, १९९८.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी–१३०५/प्र.क्र.२४/२००५/१३, दिनांक १२ डिसेंबर, २००६.

__**शासन निर्णय :**__

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याबाबत सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्याचे निदेश मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई यांनी श्री. राजेंद्र घुणकीकर विरुद्ध महाराष्ट्र शासन (मूळ अर्ज क्र. ६७०/२००८) वर दिले आहेत. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

''ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमात १० वी/१२ वी (माध्यमिक/उच्च माध्यमिक) परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहित केलेली असेल त्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला **वा** यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा.''

२. बृहन्मुंबईतील लिपिक–टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमातील २ (इ) मध्ये ''महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत असल्याचे नमूद केले आहे.'' तसेच, उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणेही आवश्यक आहे. राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान, नवी दिल्ली या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेल्या एका उमेदवाराने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारणाकडे दाखल केलेल्या प्रकरणात (मूळ अर्ज क्रमांक २०४/२०१०) राज्य शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे आदेश दिले आहेत. केंद्र शासनाने कायद्यान्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institution of Open Schooling, New Delhi) या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा (किमान ५ विषयांसह) उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना शालेय शिक्षण विभागाने अकरावी प्रवेशासाठी पात्र ठरविले आहे. मात्र, शासन सेवेतील नियुक्तीसंदर्भात समकक्षतेबाबत कोणतेही आदेश नाहीत. केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सर्व राज्यांना, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institute of Open Schooling, New Delhi) यांच्याकडून दिली जाणारी प्रमाणपत्रे उच्च शिक्षण व नोकरीसाठी (Employment) ग्राह्य (समकक्ष) धरण्याबाबत कळविले आहे. ही बाब विचारात घेऊन, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत माध्यमिक शालांत परीक्षेबाबत दिलेले प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परीक्षा अशी अर्हता असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

''राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली यांची (मराठी व इंग्रजीसह किमान ५ विषयांसह) शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर प्रमाणपत्र (Secondary School Examination Certificate) धारण करणाऱ्या उमेदवारांनी, राज्य शासन सेवेमध्ये ज्या ज्या ठिकाणी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी अर्हता विहित केली असेल त्या त्या ठिकाणी शासन सेवेसाठी शालांत परीक्षा समकक्ष पात्रता आपोआप धारण केली आहे असे समजण्यात यावे.''

३. त्यानुसार, सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी. हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०५२०१३५१०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(बा. वि. निकम)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## ९.७ : NOTIFICATION OF DISTANCE EDUCATION COUNCIL

विद्यार्थी एकाच वेळी मुक्त विद्यापीठ व पारंपरिक विद्यापीठातील दोन शिक्षणक्रमांना प्रवेश घेणार असल्यास खालील नोटिफिकेशन काळजीपूर्वक वाचावे व नोंद घ्यावी.

# DISTANCE EDUCATION COUNCIL
# INDIRA GANDHI NATIONAL OPEN UNIVERSITY

F.No. DEC/Notification/40.5.1.5/2012
Dated : 01.11.2012

**NOTIFICATION**

**Subject :** **Policy on pursuing two or more programmes simultaneously in various combina tions - regarding.**

The Distance Education Council in its 40th meeting held on 8.06.2012 has decided on the policy on pursuing two or more programmes simultaneously in various combinations. Two degree programmes cannot be allowed to be pursued simultaneously. However, a student can pursue two programmes simultaneously through distance or combination of distance and regular modes from the same or different University(ies)/Institution(s) in various combinations, *viz.*

1. One Degree and one Diploma/Post Graduate Diploma/Certificate.
2. One Post Graduate Diploma and one Diploma/Certificate.
3. One Diploma and one Certificate.
4. Two Post Graduate Diplomas.
5. Two Diplomas.
6. Two Certificates.

This is for information and adherence by all concerned.

**(DIRECTOR)**

**TO,**

**VCs of all SOUs/Heads of DEIs**

3. **The Registrar**
   YCMOU
   Dnynagangotri, Near Gangapur Dam
   Nashik - 422 222
   Maharashtra

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**नाशिक- ४२२ २२२**

## प्रवेश-अर्ज जमा पावती

(विद्यार्थ्याने ही प्रत जपून ठेवावी)

(वर्ष २०१३-१४)

श्री/श्रीमती ..........................................................................

यांच्याकडून प्रवेश-अर्ज, बँकेत शुल्क भरलेल्या चलनाची प्रत व त्यासाठीची आवश्यक कागदपत्रे विभागीय संचालक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्याकडे सुपूर्द करण्यासाठी प्राप्त झाली.

त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

शिक्षणक्रमाचे नाव : संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम

शिक्षणक्रमाचा संकेतांक : C08

बँकेचे नाव ........... ..................................... चलन क्रमांक ..............

शुल्क रुपये ................................. दिनांक : / /२०

दिनांक : / /२०

**केंद्रसंयोजक**

(सही)

**अभ्यासकेंद्र शिक्का**

विद्यापीठाविषयी तसेच अन्य उपलब्ध शिक्षणक्रम व अभ्यासकेंद्रांविषयी अधिक माहिती विद्यापीठाच्या पुढील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**http://ycmou.digitaluniversity.ac**

## NOTES

## *अनुक्रमणिका*

**शैक्षणिक वेळापत्रक** ........ १
१. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय ........ २
२. शिक्षणक्रमाविषयी ........ २
   २.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये
   २.२ श्रेयांक
   २.३ शिक्षणक्रमाची उपयुक्तता
   २.४ शिक्षणक्रमाचा परिचय
   २.५ शिक्षणक्रमाची संरचना
   २.६ शिक्षणक्रमाचा कालावधी
   २.७ अध्ययन पद्धती
   २.८ माध्यम
३. प्रवेश पात्रता ........ ३
४. मूल्यमापन प्रक्रिया ........ ४
   ४.१ स्वाध्याय
   ४.२ प्रात्यक्षिक
   ४.३ सादरीकरण
५. नोंदणी प्रक्रिया ........ ४
६. अभ्यासकेंद्रे ........ ५
७. विभागीय केंद्रे ........ ६
८. विशेष सूचना/संपर्कासाठी ........ ७
९. परिशिष्ट ........
८
   ९.१ संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचा पाठ्यक्रम (Syllabus)
   ९.२ प्रथम व द्वितीय कृतीसत्रांचे वेळापत्रक
   ९.३ University Grants Commission Resolution (2004)
   ९.४ मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासनमान्यता
   ९.५ मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता
   ९.६ १०वी व १२वी समकक्षतेबाबत शासन निर्णय
   ९.७ Notification of Distance Education Council

## निर्मिती

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२

© २०१३, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

- **प्रथम प्रकाशन** : मे २०१३
- **मुखपृष्ठ छपाई** : मृणाल प्रिंटर्स, सी–१२/२, नाईस, सातपूर, एम.आय.डी.सी., नाशिक – ४२२ ००७
- **मुद्रक** : श्री. अजित मोडक, प्रिंट लाईन्स, ए रोड, नाईस, सातपूर, नाशिक ४२२ ००७
- **प्रकाशक** : डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.

M13-135 (SHARDUL)